पुण्य नगरी

# राज्यस्तरीय समरगीत स्पर्धेत नागपूरची बाजी




**मुंबई** : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या राज्यस्तरीय समरगीत/स्फूर्तिगीत स्पर्धेत ललित कला भवन, विनोबाग्राम, नागपूर या संघाने स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. द्वितीय क्रमांक कामगार कल्याण भवन, कोतवालपुरा, औरंगाबाद संघाला, तर तृतीय क्रमांक कामगार कल्याण केंद्र, अमरावती संघाला जाहीर करण्यात आला आहे.

विक्रोळीच्या कन्नमवार नगर येथील कामगार कल्याण भवनमध्ये ९ ऑगस्ट क्रांतिदिनानिमित्त महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षीस कामगार कल्याण केंद्र, बल्लारपूर, चंद्रपूर आणि कामगार कल्याण केंद्र, सागरमाळ, कोल्हापूर यांना जाहीर करण्यात आले आहेत. मंडळाच्या १९ गट कार्यालय स्तरावर प्राथमिक फेरीत उत्तीर्ण झालेल्या १९ संघांचा राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग होता. यावेळी सुप्रसिद्ध गायक नंदेश उमप, कल्याण आयुक्त रविराज इळवे, प्र. उपकल्याण आयुक्त महेंद्र तायडे, स्पर्धेचे परीक्षक मधुकर खामकर, प्रतिभा वाघमारे, मंगेश चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. धनंजय येडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. आभार सहाय्यक कल्याण आयुक्त माधवी सुर्वे यांनी मानले.

## महाराष्ट्राचे समरगीत लाल किल्ल्यावर गायले जावे – नंदेश उमप

*देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात महाराष्ट्राने मोलाची भूमिका बजावली आहे. लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, राजगुरू याच मराठी मातीने दिले आहेत. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे माझी मैना हे गीत आंदोलन म्हणून उभे राहिले होते. शाहीर पठ्ठे बापूराव, शाहीर आत्माराम पाटील, शाहीर साबळे यांनी शाहिरीच्या माध्यमातून जनसामान्यांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. त्यामुळे महाराष्ट्राचे समरगीत दिल्लीच्या लाल किल्ल्यावर गायले गेले पाहिजे, अशा भावना यावेळी गायक नंदेश उमप यांनी व्यक्त केल्या. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे ९ ऑगस्ट क्रांतिदिनानिमित्त कामगार कल्याण भवन, कन्नमवार नगर, विक्रोळी येथे आयोजित राज्यस्तरीय समरगीत/स्फूर्तिगीत स्पर्धेत ते बोलत होते.*

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED
शब्दांना सत्याची धार
प्रहार

# राज्यस्तरीय समरगीत स्पर्धेत नागपूरची बाजी

**मुंबई (प्रतिनिधी) :**

देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात महाराष्ट्राने मोलाची भूमिका बजावली आहे. लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, राजगुरू याच मराठी मातीने दिले आहेत. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे माझी मैना हे गीत आंदोलन म्हणून उभे राहिले होते. शाहीर पठ्ठे बापूराव, शाहीर आत्माराम पाटील, शाहीर साबळे यांनी शाहिरीच्या माध्यमातून जनसामान्यांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. त्यामुळे महाराष्ट्राचे समरगीत दिल्लीच्या लाल किल्ल्यावर गायले गेले पाहिजे, अशा भावना सुप्रसिद्ध गायक नंदेश उमप यांनी व्यक्त केल्या.




महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे ९ ऑगस्ट क्रांतिदिनानिमित्त कामगार कल्याण भवन, कन्नमवार नगर, विक्रोळी येथे आयोजित राज्यस्तरीय समरगीत/स्फूर्तिगीत स्पर्धेत ते बोलत होते. कल्याण आयुक्त रविराज इळवे, प्र. उपकल्याण आयुक्त महेंद्र तायडे, स्पर्धेचे परीक्षक मधुकर खामकर, प्रतिभा वाघमारे, मंगेश चव्हाण आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. स्पर्धेचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. धनंजय येडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

ललित कला भवन, विनोबाग्राम, नागपूर या संघाने स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. द्वितीय क्रमांक कामगार कल्याण भवन, कोतवालपूरा, औरंगाबाद संघाला, तर तृतीय क्रमांक कामगार कल्याण केंद्र, अमरावती संघाला जाहीर करण्यात आला आहे. उत्तेजनार्थ बक्षीस कामगार कल्याण केंद्र, बल्लारपूर, चंद्रपूर आणि कामगार कल्याण केंद्र, सागरमाळ, कोल्हापूर यांना जाहीर करण्यात आले आहेत. मंडळाच्या १९ गट कार्यालय स्तरावर प्राथमिक फेरीत उत्तीर्ण झालेल्या १९ संघांचा राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग होता. आभार सहायक कल्याण आयुक्त माधवी सुर्वे यांनी मानले.

दैनिक यशोभूमि

# 'समर गीत' प्रतियोगिता में नागपुर ने बाजी मारी

**मुंबई(यशोडेस्क),** महाराष्ट्र ने देश के स्वतंत्रता संग्राम में महत्वपूर्ण भूमिका निभाई है। इसी महाराष्ट्र की मिट्टी से लोकमान्य तिलक, स्वतंत्रवीर सावरकर, राजगुरु जैसे वीर सेनानी दिए हैं। लोकशाहीर अन्नाभाऊ साठे का मांझी मैना गीत संयुक्त महाराष्ट्र आंदोलन में एक घोष गीत के रूप में लोगों की जुबान पर था। इसी तरह शाहीर पठ्ठे बापूराव, शाहीर आत्माराम पाटील, शाहीर साबले ने शाहिर के माध्यम से जनता में उत्साह पैदा किया। इसलिए महाराष्ट्र के समर गीत को दिल्ली के लाल किले पर गाया जाना चाहिए। जाने-माने गायक नंदेश उमप ने उक्त उद्गार व्यक्त किया। वह 9 अगस्त को अगस्त क्रांति दिवस पर कामगार कल्याण भवन, कन्नमवार नगर, विक्रोली में




महाराष्ट्र कामगार कल्याण मंडल द्वारा आयोजित राज्य स्तरीय समरगीत/स्फूर्ति गीत प्रतियोगिता में बोल रहे थे। इस अवसर पर कल्याण आयुक्त रविराज इलवे, प्र. उपकल्याण आयुक्त महेंद्र तायडे, स्पर्धा के परीक्षक मधुकर खामकर, प्रतिभा वाघमारे, मंगेश चव्हाण आदि उपस्थित थे। स्पर्धा का उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाड़ा विद्यापीठ के पूर्व कुलपति डॉ. धनंजय येडेकर ने किया। प्रतियोगिता में ललित कला भवन विनोबाग्राम नागपुर की टीम ने प्रथम स्थान प्राप्त किया है। द्वितीय पुरस्कार श्रमिक कल्याण भवन कोतवालपुरा औरंगाबाद की टीम को, जबकि तृतीय पुरस्कार के लिए श्रमिक कल्याण केंद्र अमरावती की टीम को चुना गया। सांत्वना पुरस्कार कामगार कल्याण केंद्र बल्लारपुर, चंद्रपुर और कामगार कल्याण केंद्र, सागरमाल कोल्हापुर को दिया गया।

यशोभूमी संस्करण
१३ ऑगस्ट २०२२ पृष्ठ क्रमांक २
द्वारा समर्थित: eReleGo.com